## कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

**टोल फ्री क्रमांक - 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 29.07.2020.

**म.रा.वि.वि. कंपनी मर्या. ग्रामीण शाखा - 2 जालना येथील कनिष्ठ अभियंता श्री. नुर मोहम्मद सिद्दीकी वय 34 वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता यास 2,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. नुर मोहम्मद सिद्दीकी वय 34 वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्या. ग्रामीण शाखा - 2 जालना रा. दु:खीनगर जालना मुळ रा. घर नं 75, चंपा चौक, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि- 29.07.2020 रोजी म.रा.वि.वि. कंपनी मर्या. ग्रामीण शाखा - 2 कार्यालय सर्व्हे नं 488 जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 2,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे मुलाचे नावाने असलेल्या जागेवरील धोकादायक स्थितीत झुकलेला ईलेक्ट्रिक लोखंडी पोल त्यांनी महावितरण विदयुत कंपनीचे लेखी परवानगी शिवाय हलविला, म्हणुन म.रा.वि.वि. कंपनी मर्या. ग्रामीण शाखा जालना येथील कनिष्ठ अभियंता श्री नुर मोहम्मद सिद्दीकी यांनी तुमच्यावर कायदेशिर कार्यवाही करावी लागेल, जर तुमच्यावर कायदेशिर कार्यवाही करायची नसेल तर आलोसे श्री. नुर मोहम्मद सिद्दीकी, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे 2,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि. 20.07.2020 रोजी पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे 2,000/- रुपयेची लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले होते, तसेच आज दि. 29.07.2020 रोजी आलोसे श्री. नुर मोहम्मद सिद्दीकी, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदार यांचेवर कोणतीही कायदेशिर कार्यवाही न करणेसाठी व हलविलेला ईलेक्ट्रीक पोल महावितरणचे नियमानुसार नियमित करणेसाठी त्यांचेकडुन 2,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्वीकारली असतांना, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने म.रा.वि.वि. कंपनी मर्या. ग्रामीण शाखा - 2 कार्यालय सर्व्हे नं 488 जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. नुर मोहम्मद सिद्दीकी वय 34 वर्ष व्यवसाय नोकरी कनिष्ठ अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्या. ग्रामीण शाखा - 2 जालना रा. दु:खीनगर जालना मुळ रा. घर नं 75, चंपा चौक, म्हाडा कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,जालना.